

# यहेज्केल नऊची वधाची शस्त्रे

एड्रियन एबेन्स

# यहेज्केल नऊची वधाची शस्त्रे

हायके हिमेलसाठी

कॉलिन निकोलसन आणि टीना मेरी
सायमन यांचे विशेष आभार

Printed by

MARANATHA
MEDIA
maranathamedia.com

September, 2025

ह्या पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ
साळवी ह्यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई
वोईलेट डिसोझा ह्यांनी मदत केली आहे.

# सामग्री

पुरुष, महिला आणि बाळांची कत्तल करा!............................................................ 4
यहेज्केल नऊचा संदर्भ........................................................................................ 5
इस्राएलाची मूर्तिपूजा........................................................................................... 7
मूर्तिपूजेला कशी शिक्षा दिली जाते......................................................................... 8
यहेज्केल नऊची शेवटच्या काळातील पूर्तता........................................................... 9
यहेज्केल नऊ म्हणजे दुष्टांचा सामान्य नाश.......................................................... 11
निसर्गाची तत्त्वे भूकंप, वादळ, आणि राजकीय संघर्ष.............................................12
ज्या राजाची आपण निवड करतो, त्याचीच आपण सेवा करतो................................ 17
मारण्याची आज्ञा.............................................................................................. 19
बाहेरील अंधार...................................................................................................21
बाळांना मारणे? खरंच?..................................................................................... 23
परवानगी देणाऱ्या आज्ञांचा वापर........................................................................24

## पुरुष, महिला आणि बाळांची कत्तल करा!

यहेज्केलच्या पुस्तकात एका भयानक दृश्याचे वर्णन केले आहे:

यहेज्केल ९:१-८ मग त्याने मला ऐकू येईलसे मोठ्याने म्हटले, “नगररक्षकहो, तुम्ही सगळे आपली विध्वंसक हत्यारे हाती घेऊन इकडे या.” तेव्हा पाहा, उत्तरेकडील वरच्या वेशीने सहा पुरुष आपल्या हाती विध्वंसक हत्यारे घेऊन आले; त्यांच्यामध्ये शुभ्र तागाचे वस्त्र ल्यालेला एक मनुष्य होता; त्याच्या कंबरेनजीक कारकुनाची दऊत होती. ते आत जाऊन पितळी वेदीजवळ उभे राहिले. करूबारूढ असलेल्या इस्राएलाच्या देवाचे तेज तेथून निघून मंदिराच्या उंबरठ्यावर आले; आणि कंबरेनजीक कारकुनाची दऊत असलेल्या व शुभ्र तागाचे वस्त्र ल्यालेल्या त्या मनुष्यास त्याने हाक मारली. परमेश्वर त्याला म्हणाला, “नगरामधून, यरुशलेमेमधून जाऊन जी माणसे आपल्यात होत असलेल्या सर्व अमंगळ कृत्यांमुळे उसासे टाकून विलाप करीत आहेत त्यांच्या कपाळावर चिन्ह कर.” मला ऐकू येईल असे तो त्या बाकीच्यांना म्हणाला, “त्याच्यामागून नगरात जा व संहार करा; कृपादृष्टी करू नका; गय करू नका, वृद्ध, तरुण व कुमारी, मुले व स्त्रिया ह्यांची निखालस कत्तल करा; पण ज्यांच्यावर चिन्ह असेल त्यांना स्पर्श करू नका; माझ्या पवित्रस्थानापासून आरंभ करा.” तेव्हा मंदिरापुढे असलेल्या वडिलांपासून त्यांनी आरंभ केला. त्याने त्यांना म्हटले, “मंदिर भ्रष्ट करा; अंगणे वधलेल्यांनी भरून टाका; चला, निघा.” तेव्हा त्यांनी जाऊन नगरात संहार चालवला. त्यांनी अशी कत्तल चालवली असता मी सुटलो, तेव्हा मी उपडा पडून ओरडून म्हणालो, “हायहाय! प्रभू परमेश्वरा, तू यरुशलेमेवर आपल्या क्रोधाचा वर्षाव करून अवघ्या अवशिष्ट इस्राएलांचा विध्वंस करशील काय?”

ही प्रतिमा फारच भयानक आहे. एक मनुष्य शहरातून फिरत आहे, इस्राएलमधील धर्मत्यागाबद्दल शोक करणाऱ्यांचा शोध घेत आहे. त्यांच्या डोक्यावर एक खूण ठेवली जाते, जी त्यांना मागोमाग येणाऱ्या वध करण्याच्या शस्त्रांनी सज्ज असलेल्या लोकांपासून सुरक्षित ठेवेल. ज्यांच्यावर ही खूण नाही, त्यांना निर्दयतेने कापून ठार केले जाते. पुरुष, स्त्रिया आणि अगदी लहान बाळांनाही सर्वांची निर्दयपणे हत्या केली जाते. कुणालाही दया दाखवली जात नाही, कुणालाही वाचवले जात नाही.

शतकानुशतके यहोवा आपल्या संदेष्ट्यांद्वारे इस्राएलाशी विनंती करत होता की त्यांनी आपली मूर्तिपूजा सोडावी आणि त्याच्याकडे परत यावे. पण त्यांनी ऐकायला नकार दिला. इ.स.पू. 606 च्या सुमारास संदेष्टा यिर्मयाने यरुशलेमवर होणाऱ्या तीन आक्रमणांपैकी पहिल्याचे भाकीत केले होते.

यिर्मया २५:१-९ यहूदाचा राजा योशीयाचा पुत्र यहोयाकीम ह्याच्या कारकिर्दीच्या चौथ्या वर्षी, म्हणजे बाबेलचा राजा नबुखद्रेस्सर ह्याच्या कारकिर्दीच्या पहिल्या वर्षी यहूदाच्या सर्व लोकांविषयी यिर्मयाला जे वचन प्राप्त झाले ते हे : यिर्मया संदेष्ट्याने यहूदाचे सर्व लोक व सर्व यरुशलेमनिवासी ह्यांना सांगितले की, "यहूदाचा राजा आमोनाचा पुत्र योशीया ह्याच्या कारकिर्दीच्या तेराव्या वर्षापासून आजवर तेवीस वर्षे परमेश्वराचे वचन मला प्राप्त होत असून ते मी तुम्हांला सांगत आलो, मोठ्या निकडीने सांगत आलो; तरी तुम्ही ते ऐकले नाही. परमेश्वर आपले सर्व सेवक जे संदेष्टे त्यांना तुमच्याकडे पाठवत आला, मोठ्या निकडीने पाठवत आला, तरी तुम्ही ऐकले नाही, आपला कान लावला नाही. ते म्हणाले, 'तुम्ही सगळे आपल्या कुमार्गांपासून, आपल्या कर्मांच्या दुष्टतेपासून फिरा, म्हणजे परमेश्वराने तुम्हांला व तुमच्या पूर्वजांना जो देश युगानुयुग दिला आहे त्यात तुम्ही राहाल; अन्य देवांची सेवा करण्यास व त्यांचे भजनपूजन करण्यास त्यांच्यामागे जाऊ नका, म्हणजे तुम्ही आपल्या हातच्या कृतीने मला संताप आणणार नाही व मी तुमचे वाईट करणार नाही.' तरी आपल्या हातच्या कृतीने मला संताप आणून आपले नुकसान करून घ्यावे म्हणून तुम्ही माझे ऐकत नाही, असे परमेश्वर म्हणतो. ह्यास्तव सेनाधीश परमेश्वर म्हणतो, तुम्ही माझी वचने ऐकली नाहीत. म्हणून पाहा, मी उत्तरेकडील सर्व राष्ट्रांना व माझा सेवक बाबेलचा राजा नबुखद्रेस्सर ह्याला बोलावून आणतो, असे परमेश्वर म्हणतो; त्यांना या देशावर, त्यातील रहिवाशांवर आणि आसपासच्या सर्व राष्ट्रांवर आणतो; मी त्यांचा अगदी नाश करून ती विस्मयास व उपहासास पात्र आणि कायमची उजाड करीन.

## यहेज्केल नऊचा संदर्भ

दानिएल आणि त्याचे मित्र यांना इ.स.पू. 606 मध्ये यरुशलेमवर झालेल्या पहिल्या आक्रमणात पकडून नेले गेले. परंतु यरुशलेमने पश्चात्ताप केला नाही, किंवा धडा शिकला नाही. इ.स.पू. 599 मध्ये त्यांच्यावर दुसऱ्यांदा हल्ला

करण्यात आला, तरीही त्यांनी पश्चात्ताप केला नाही. शेवटी इ.स.पू. 586 मध्ये नबुखद्नेस्सरने शहर पूर्णपणे उध्वस्त केले. उरायाह स्मिथ खालील वर्णन देतो:

“यरुशलेमचा वेढा.जणू तो केवळ सर्वांना परिचित असलेले सत्यच सांगत आहे, अशा आत्मविश्वासाने तो ताबडतोब अनेक तपशील मांडतो, ज्यांवरून त्याच्या वर्णनाची अचूकता पडताळली जाऊ शकते. येथे नोंदवलेले यरुशलेमचे पतन यिर्मयाने भाकीत केले होते, आणि ते इ.स.पू. 606 मध्ये पूर्ण झाले. (यिर्मया 25:8-11). यिर्मया हे बंधन यहोयाकीमच्या चौथ्या वर्षात ठेवतो, तर दानियेल ते तिसऱ्या वर्षात ठेवतो. हा भासमान फरक या गोष्टीमुळे स्पष्ट होतो की नबुखद्नेस्सरने आपली मोहीम यहोयाकीमच्या तिसऱ्या वर्षाच्या अखेरीस सुरू केली होती, आणि त्या बिंदूपासून दानिएल मोजतो. पण प्रत्यक्षात राजाने यरुशलेमवर वर्चस्व प्रस्थापित केले ते पुढील वर्षाच्या सुमारे नवव्या महिन्यात, आणि त्या वर्षापासून यिर्मया मोजतो. यहोयाकीमला बंधनात बांधून बाबेलला नेण्याचा उद्देश होता, पण त्याने स्वतःला नम्र केले आणि त्याला यरुशलेममध्ये राजा म्हणून राहण्याची परवानगी मिळाली, मात्र तो बाबेलच्या राजाचा करदास होता.

हीच ती पहिली वेळ होती की नबुखद्नेस्सरने यरुशलेम जिंकले. त्यानंतर दोन वेळा या शहराने बंड केले, पण त्याच राजाने परत त्यावर विजय मिळवला, आणि प्रत्येक वेळी अधिक कठोरतेने वागणूक दिली. दुसरे पतन यहोयाकीमचा मुलगा यहोयाकीनच्या काळात झाले, तेव्हा सर्व पवित्र भांडी काढून नेण्यात आली किंवा नष्ट करण्यात आली, आणि शहरातील सर्वोत्कृष्ट लोक राजासह बंधनात बाबेलला नेले गेले. तिसरे पतन जेदेकियाच्या काळात झाले, तेव्हा शहरावर भयंकर वेढा घातला गेला. तो दीड वर्ष टिकला, आणि या काळात शहरातील लोकांनी तीव्र दुष्काळामुळे प्रचंड यातना भोगल्या. शेवटी किल्ल्याचे रक्षक आणि राजा शहरातून पळून जाण्याचा प्रयत्न करू लागले, पण त्यांना खासदि लोकांनी पकडले. राजाचे पुत्र त्याच्या डोळ्यांसमोर ठार मारले गेले. त्याचे डोळे फोडले गेले, आणि त्याला बाबेलला नेण्यात आले. अशा रीतीने यहेज्केलच्या भविष्यवाणीची पूर्तता झाली की तो बाबेलला नेला जाईल आणि तिथे मरेल, पण तो त्या ठिकाणाला पाहणार नाही (यहेज्केल 12:13). या वेळी शहर आणि मंदिर पूर्णपणे उद्ध्वस्त झाले, आणि काही शेतकरी सोडून संपूर्ण लोकसंख्या बाबेलला कैदेत नेण्यात आली. हे इ.स.पू. 586 मध्ये घडले.” उरायाह स्मिथ, Daniel and Revelation. दानियेल 1:1-2 वरील टीका.

इ.स.पू. 594 च्या सुमारास, म्हणजेच तिसऱ्या आणि अंतिम विनाशाच्या सात वर्षांआधी, यहेज्केलने यहेज्केल 9 मध्ये आपले थरकाप उडवणारे शब्द भाकीत केले. त्यात शहरावर अधिकार असलेल्या लोकांविषयी सांगितले आहे, जे उत्तरेकडून येत होते. इ.स.पू. 606 पासून नबुखद्नेस्सरला यरुशलेमवर अधिकार होता आणि तो यरुशलेमच्या उत्तरेला होता.

यहेज्केल ९:१-२ मग त्याने मला ऐकू येईलसे मोठ्याने म्हटले, “नगररक्षकहो, तुम्ही सगळे आपली विध्वंसक हत्यारे हाती घेऊन इकडे या.” तेव्हा पाहा, उत्तरेकडील वरच्या वेशीने सहा पुरुष आपल्या हाती विध्वंसक हत्यारे घेऊन आले; त्यांच्यामध्ये शुभ्र तागाचे वस्त्र ल्यालेला एक मनुष्य होता; त्याच्या कंबरेनजीक कारकुनाची दऊत होती. ते आत जाऊन पितळी वेदीजवळ उभे राहिले.

विशेष लक्षवेधी बाब म्हणजे जोसेफस ने या काळात यरुशलेमला वेढा घालणाऱ्या पाच सेनापतींचा उल्लेख केला आहे.

शहर जेदेकियाच्या राज्याच्या अकराव्या वर्षी, चौथ्या महिन्याच्या नवव्या दिवशी जिंकले गेले. हे खरेतर बाबेलच्या राजाचेच सेनापती होते, ज्यांच्यावर नबुखद्नेस्सरने वेढ्याची जबाबदारी सोपवली होती, कारण तो स्वतः रिब्लाह या शहरात थांबला होता.  “यरुशलेमची नासधूस करून ते जिंकणाऱ्या सेनापती ची नावे अशी होती,, (जर कोणाला ती जाणून घ्यायची इच्छा असतील तर): (1) नेर्गल-शरेझर, (2) सामगर-नेबो, (3) रबसारीस, (4) सोर्शेकीम, आणि (5) रबमग. आणि जेव्हा शहर अर्ध्या रात्री जिंकले गेले, आणि शत्रूचे सेनापती मंदिरात आले, आणि जेदेकियाला हे कळले, तेव्हा त्याने आपल्या बायका, मुले, सरदार, आणि मित्र यांना घेतले आणि त्यांच्यासह शहरातून पळ काढला—किल्लेबंद खंदकातून आणि वाळवंटातून. आणि काही पलायनकर्त्यांनी बाबेलच्या लोकांना याची माहिती दिल्यावर, सकाळ होताच त्यांनी जेदेकियाचा पाठलाग करण्याची घाई केली आणि त्याला यरीहोपासून फार दूर नसताना गाठले, आणि त्याला चहुबाजूंनी वेढले. जोसेफस, Antiquities of the Jews, पुस्तक 10, अध्याय 8.2

अडम क्लार्क यहेज्केल 9:1 वरील आपल्या भाष्यात याचा उल्लेख करतो:

“वध करण्याची शस्त्रे असलेल्या त्या सहा पुरुषांद्वारे खास्दी लोक दाखवले गेले आहेत, ज्यांना शहर नष्ट करण्याचा आदेश मिळाला होता; आणि जेव्हा अशा

प्रसंगांत उत्तर दिशेचा उल्लेख केला जातो, तेव्हा साधारणपणे खास्दीया आणि खास्दी लोकांची सैन्ये यांचा उद्देश असतो.” Adam Clarke Commentary on Ezekiel 9:1

येथे थोडीशी अस्पष्टता आहे की वध करण्याची शस्त्रे असलेले सहा पुरुष आहेत, आणि शाईदान असलेला मनुष्य त्यांच्यापेक्षा वेगळा असल्याने एकूण सात होतात; की मग प्रत्यक्षात पाच जण वध करण्याची शस्त्रे घेऊन आहेत, आणि लेखक स्वतःच त्यांच्यातील सहावा आहे. एलेन व्हाईट पाच वधशस्त्रधारी पुरुषांचा उल्लेख करते, जे आपण पुढे पाहू; आणि तरीही जेम्स व्हाईट सहा वधशस्त्रधारी पुरुषांचा उल्लेख करतो. हा मुद्दा फारसा वादग्रस्त नाही, पण या अभ्यासात लक्षात ठेवण्याजोगा आहे.

## इस्राएलाची मूर्तिपूजा

येथे हे अधोरेखित करणे महत्त्वाचे आहे की इस्राएल मूर्तिपूजेत गंभीरपणे गुंतला होता, जसे की यहेज्केल अध्याय 8 आणि इतर अनेक ठिकाणी दाखवले गेले आहे.

यहेज्केल ८:१४-१६ तेव्हा त्याने मला परमेश्वराच्या मंदिराच्या उत्तरेस असलेल्या दरवाजाजवळ आणले, तर तेथे स्त्रिया बसून तम्मुजासाठी शोक करत होत्या. तो मला म्हणाला, “मानवपुत्रा, तुला हे दिसते ना? ह्याहून अधिक अमंगळ गोष्टी तुझ्या दृष्टीस पडतील.” तेव्हा त्याने मला परमेश्वराच्या मंदिराच्या आतल्या अंगणात नेले, तो पाहा, परमेश्वराच्या मंदिराच्या द्वारी देवडीच्या व वेदीच्या दरम्यान सुमारे पंचवीस इसम परमेश्वराच्या मंदिराकडे पाठ करून व पूर्वेकडे तोंड करून उभे होते; ते पूर्व दिशेस सूर्याची उपासना करीत होते.

आपण हेही पाहतो की इस्राएल पूर्वेकडून येणाऱ्या देवतांची पूजा करीत होते. मूर्तिपूजेची संपूर्ण व्यवस्था बाबेल प्रदेशात, निम्रोदच्या काळात विकसित झाली होती, जो प्रदेश इस्राएलच्या ईशान्य दिशेला होता. जेव्हा बाबेलचे सैन्य इस्राएलवर आक्रमण करण्यासाठी आले, तेव्हा ते थेट वाळवंट ओलांडून न येता उत्तरेकडून आले.

यशया २:६ तुझे लोक, म्हणजे याकोबाचे घराणे, ह्यांचा तू त्याग केला आहेस;

कारण ते पूर्वेकडील रीतिभातींत मग्न झाले आहेत, पलिष्ट्यांसारखे मांत्रिक बनले आहेत आणि परदेशीयांच्या हातात हात घालत आहेत,

येथे मुख्य मुद्दा असा आहे की इस्राएलाने जेव्हा बाबेलच्या देवतांची पूजा केली, तेव्हा शेवटी त्यांना बाबेलाच्या हातातच दिले गेले. मूर्तिपूजेत गुंतण्याचा निर्णय घेऊन इस्राएल सैतानाला सन्मान अर्पण करीत होता, आणि म्हणूनच सैतानाला त्यांना आपल्या हाती मागण्याचा अधिकार मिळाला.

## मूर्तिपूजेबद्दल कशी शिक्षा दिली जाते

दहा आज्ञा आपल्याला स्पष्टपणे सांगतात की जेव्हा आपण मूर्तिपूजेत गुंततो तेव्हा काय होते:

निर्गमी २०:५ त्यांच्या पाया पडू नकोस किंवा त्यांची सेवा करू नकोस; कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे; जे माझा द्वेष करतात त्यांच्या मुलांना तिसऱ्या-चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल मी शासन करतो;

इस्राएल मूर्तिपूजेत गुंतले होते आणि वचन सांगते की यासाठीचा न्याय असा आहे की पित्यांची अधर्मे मुलांवर येतात; आणि आपण यहेज्केल अध्याय 9 मध्ये इस्राएलसाठी हे प्रत्यक्ष घडताना पाहतो. अनेक पिढ्यांची मूर्तिपूजेची पापे अखेरीस दानिएल आणि त्याच्या मित्रांच्या पिढीवर त्या अधर्माच्या भेटीने संपली. बाबेलशी असलेले नाते महत्त्वाचे आहे कारण ते दाखवते की हे दर्शन नैसर्गिक परिणामांशी जोडलेले आहे, आणि या भविष्यवाणीस तात्काळ पूर्णत्व मिळाल्याने ते दिसून येते. आपणास ठाऊक आहे की इ.स.पू. 586 मध्ये यरुशलेमचा झालेला विनाश हा या भविष्यवाणीचा पूर्ण अर्थाने झालेला पूर्णत्व नव्हता, तरीही तो हे दाखवतो की इस्राएलच्या स्वतःच्या पापांचा परिणाम म्हणून ही भविष्यवाणी मानवी हातांनी पूर्ण होत गेली.

## यहेज्केल नऊचीशेवटच्या काळातील पूर्तता

यहेज्केल अध्याय 9 मधील दृष्टांताला, यहेज्केला हे दर्शन मिळाल्यानंतर सात वर्षांनी झालेल्या यरुशलेमच्या विनाशात अंशतः पूर्णत्व मिळाले, पण हे स्पष्ट

आहे की त्याचे संपूर्ण पूर्णत्व पृथ्वीच्या इतिहासाच्या शेवटच्या दिवसांत होईल, कारण आपण प्रकटीकरणाच्या पुस्तकामध्ये अशीच एक समांतर भविष्यवाणी पाहतो जी शेवटच्या दिवसांविषयी बोलते.

प्रकटीकरण ७:१-३ ह्यानंतर मी चार देवदूत 'पृथ्वीच्या चार कोनांवर' उभे राहिलेले पाहिले, ते पृथ्वीवरून व समुद्रावरून वारा वाहू नये व कोणत्याही झाडाला लागू नये म्हणून पृथ्वीचे 'चार वारे' अडवून धरत होते. मी आणखी एक देवदूत सूर्योदयाच्या दिशेने वर चढताना पाहिला, त्याच्याजवळ जिवंत देवाचा शिक्का होता; ज्या चार देवदूतांकडे पृथ्वीला व समुद्राला उपद्रव करण्याचे काम सोपवले होते त्यांना तो उच्च स्वराने म्हणाला, "आमच्या देवाचे जे दास आहेत त्यांच्या 'कपाळांवर' आम्ही 'शिक्का मारीपर्यंत' पृथ्वीला, समुद्राला व झाडांना उपद्रव करू नका."

तुम्ही यहेज्केल 9 आणि प्रकटीकरण 7 यांच्यातील संबंध ऍडव्हेंटिस्ट इतिहासामध्ये अशा विधानांत पाहूशकता : देव तुम्हाला हाक देत आहे की तुम्ही ठरवा त्याच्या आज्ञा पाळून त्याची शिक्कामोर्तब मिळवणार आहात का, किंवा त्याच्या प्रतिस्पर्ध्याचे, श्वापदाचे ऐकून त्याची खूण मिळवणार आहात? तो तुम्हाला दुसरा मार्ग निवडल्यास होणाऱ्या भयानक परिणामांविषयी चेतावणी देत आहे. त्याचा प्रकोपाचा महान दिवस अगदी आपल्या समोर आहे, आणि त्या दिवशी आपल्याला एका ढालीची गरज असेल. नाश करणारा देवदूत वाटेत उभा आहे; वधशस्त्र घेऊन असलेले पुरुष प्रहार करण्यास सज्ज आहेत; चार वारे सोडले जाणार आहेत; आणि फक्त देवाची खूण, चिन्ह किंवा शिक्कामोर्तब हाच आपल्याला रक्षण देईल, ज्यामुळे नाश करणारा आपल्यावरून पुढे जाईल. (निर्गम 12, 13; यहेज्केल 9; प्रकटीकरण 7:1-4 पहा). आर. एफ. कॉट्रेल, Review and Herald, 28 जुलै 1859

प्रत्यक्ष तपासणीस सुरुवात करण्यापूर्वी हे दाखविणे उचित ठरेल की "शिक्का," "नाव," "खूण," "चिन्ह," आणि "निशाणी" हे शब्द समानार्थी आहेत यापैकी एकाबद्दल जे काही सत्य म्हणता येते, तेवढ्याच प्रमाणात दुसऱ्याबद्दलही म्हणता येईल. जर वाचकाने वॅब्स्टरच्या. शब्दकोशात पाहण्याची तसदी घेतली तर त्याला "शिक्का" या शब्दाच्या व्याख्यांपैकी पुढील व्याख्या सापडतील:

"प्रमाणिकतेची खूण म्हणून शिक्का लावणे किंवा चिकटवणे;" "निश्चित करणे, मान्यता देणे, स्थापन करणे." त्याच अधिकाऱ्यानुसार "चिन्ह" म्हणजे "निशाणी" किंवा "खूण." "निशाणी" अशी व्याख्या केली जाते: "चिन्ह, खूण,

स्मृती, प्रकट करण्यासाठी," इत्यादी. परंतु या मुद्द्यावर वॅब्स्टर आपल्यासाठी सर्वोच्च अधिकार नाही. प्रकटीकरण 7:1-4: ह्यानंतर मी चार देवदूत ‘पृथ्वीच्या चार कोनांवर’ उभे राहिलेले पाहिले, ते पृथ्वीवरून व समुद्रावरून वारा वाहू नये व कोणत्याही झाडाला लागू नये म्हणून पृथ्वीचे ‘चार वारे’ अडवून धरत होते. मी आणखी एक देवदूत सूर्योदयाच्या दिशेने वर चढताना पाहिला, त्याच्याजवळ जिवंत देवाचा शिक्का होता; ज्या चार देवदूतांकडे पृथ्वीला व समुद्राला उपद्रव करण्याचे काम सोपवले होते त्यांना तो उच्च स्वराने म्हणाला, “आमच्या देवाचे जे दास आहेत त्यांच्या ‘कपाळांवर’ आम्ही ‘शिक्का मारीपर्यंत’ पृथ्वीला, समुद्राला व झाडांना उपद्रव करू नका.” ज्यांच्यावर शिक्का मारण्यात आला त्यांची संख्या मी ऐकली; इस्राएल लोकांच्या सर्व वंशांपैकी एक लक्ष चव्वेचाळीस हजारांवर शिक्का मारण्यात आला." आता प्रकटीकरण 14:1-4 याची तुलना वर दिलेल्याशी केली असता हे दिसून येते की तेच 1,44,000 लोक येथे दाखवले आहेत, "ज्यांच्या कपाळावर त्यांच्या पित्याचे नाव लिहिलेले होते." प्रकटीकरण 7 मध्ये, जिवंत देवाचा शिक्का त्यांच्या कपाळावर ठेवण्यात येतो, जेणेकरून तिथे वर्णन केलेल्या न्यायामुळे त्यांना इजा होऊ नये. यहेज्केल 9 मध्ये, हाच "इजा करण्याचा" प्रकार दुसऱ्या प्रतिमेद्वारे दाखवला आहे. तिथे सहा पुरुष दाखवले गेले आहेत, "वध करण्याची शस्त्रे" किंवा "तुकडे करण्यासाठीची शस्त्रे" (बाजूच्या नोंदीनुसार) हातात घेऊन जवळ येत आहेत; पण त्यांना त्यांच्या विनाशाच्या कामास सुरुवात करण्याची परवानगी नाही, जोपर्यंत "शाईदान असलेला मनुष्य" शहरातून फिरून "त्या सर्वांच्या कपाळावर खूण लावत नाही, जे त्याच्या मध्यभागी होणाऱ्या सर्व घृणास्पद गोष्टींसाठी उसासे टाकतात आणि रडतात." मगच वधशस्त्रधारी पुरुषांना आज्ञा मिळते की, ज्यांच्यावर खूण आहे त्यांना सोडून इतर सर्वांचा संपूर्ण नाश करावा (यहेज्केल 9:6 पहा). येथील वध म्हणजेच आपण प्रकटीकरण 14:9 मध्ये उल्लेख केलेल्या "देवाच्या क्रोधाच्या प्याल्यात निरा घातलेला" समजतो. — जेम्स व्हाईट, What is the Mark of the Living God, Review and Herald, 15 सप्टेंबर 1863

ज्यांच्यावर खूण नाही त्यांचा वध तिसऱ्या देवदूताच्या संदेशानंतर घडतो असे समजले जाते, कारण हा वध म्हणजे देवाचा प्रकोप, जो त्याच्या संतापाच्या प्याल्यात कोणतेही मिश्रण न करता ओतला जातो.

एलेन व्हाईट वधशस्त्रधारी पुरुषांविषयी पुढील सूचना देते. ती यहेज्केल 9 मधील दर्शन आणि प्रकटीकरण 7 मधील दर्शन यांना पुढीलप्रमाणे जोडते:

“देवाच्या सेवकांवर होणारे हे शिक्कामोर्तब हेच ते आहे जे यहेज्केला दर्शनात दाखवले गेले होते. योहान हाही या सर्वांत धक्कादायक प्रकटीकरणाचा साक्षी होता.” (Testimonies to Ministers, p. 445)

जर ही दोन्ही दर्शने समान असतील, तर वधशस्त्रधारी पुरुष हे देवदूतांनी प्रकटीकरण 7 मध्ये सोडलेल्या संघर्षाच्या वाऱ्यांशी समांतर आहेत.

## यहेज्केल नऊ म्हणजे दुष्टांचा सामान्य नाश

जोपर्यंत ते पश्चात्ताप करीत नाहीत, आणि ज्यांच्यावर कार्याचा भार आहे त्यांना दडपण्याच्या तसेच सियोनमधील पाप्यांच्या हातांना बळ देण्याच्या सैतानाच्या कामातून बाहेर पडत नाहीत, तोपर्यंत त्यांना देवाच्या शिक्कामोर्तबाच्या मान्यतेची खूण कधीच मिळणार नाही. ते वधशस्त्रे घेऊन असलेल्या पाच पुरुषांच्या कामाद्वारे दाखविलेल्या दुष्टांच्या सार्वत्रिक विनाशात पडतील. (Testimonies for the Church, Vol. 3, p. 267)

म्हणून वधशस्त्र घेऊन असलेल्या पाच पुरुषांचे काम म्हणजे दुष्टांचा सार्वत्रिक विनाश होय. हा सार्वत्रिक विनाश कसा घडतो? पुढील विधान काळजीपूर्वक पाहा:

"मी चार देवदूतांना पाहिले, ज्यांना पृथ्वीवर एक काम करायचे होते, आणि ते ते पूर्ण करण्याच्या मार्गावर होते. येशू याजकाचे वस्त्र परिधान केलेला होता. त्याने उरलेल्या मंडळींकडे करुणेने पाहिले, मग आपले हात वर केले, आणि करुणेने भरलेल्या आवाजात ओरडला, ‘माझे रक्त, पिता, माझे रक्त, माझे रक्त, माझे रक्त!’ मग मी पाहिले की देवाकडून, जो महान पांढऱ्या सिंहासनावर बसला होता, अत्यंत तेजस्वी प्रकाश निघाला, आणि तो येशूच्या सभोवती पसरला. मग मी पाहिले की येशूकडून आज्ञा घेऊन एक देवदूत वेगाने उडत आला, त्या चार देवदूतांकडे ज्यांना पृथ्वीवर काम करायचे होते, आणि त्याने आपल्या हातात काहीतरी वरखाली हालवले, आणि मोठ्या आवाजात ओरडला, ‘थांबा! थांबा! थांबा! थांबा! जोपर्यंत देवाचे सेवक त्यांच्या कपाळावर शिक्कामोर्तब होत नाहीत.’" (Early Writings, p. 38.1)

मी माझ्या सोबत असलेल्या देवदूताला विचारले की मी जे ऐकले त्याचा अर्थ काय आहे, आणि ते चार देवदूत काय करणार होते. त्याने मला सांगितले की

देवच त्या शक्तींना रोखून ठेवतो, आणि त्याने आपल्या देवदूतांना पृथ्वीवरील गोष्टींवर अधिकार दिला आहे; की त्या चार देवदूतांना देवाकडून चार वारे धरून ठेवण्याचा अधिकार दिला होता, आणि ते त्यांना सोडणार होते; पण त्यांच्या हातांतून पकड सैल होत असताना, आणि चार वारे सुटण्याच्या बेतात असताना, येशूची करुणामय दृष्टी अजून शिक्कामोर्तब न झालेलेल्या उरलेल्या लोकांवर खिळली होती, आणि त्याने आपले हात पित्याकडे वर केले आणि विनंती केली की त्याने त्यांच्या साठी आपले रक्त सांडले आहे. मग दुसऱ्या एका देवदूताला आज्ञा देण्यात आली की तो वेगाने उडत जाऊन त्या चार देवदूतांना थांबण्यास सांगे, जोपर्यंत देवाचे सेवक त्यांच्या कपाळावर जिवंत देवाच्या शिक्क्याने शिक्कामोर्तब होत नाहीत. (Early Writings, p. 38.2)

आपण पाहतो की देवाचे देवदूत दुष्टतेच्या शक्तींना रोखून ठेवत आहेत, जोपर्यंत देवाचे सेवक शिक्कामोर्तब होत नाहीत. जेव्हा हे कार्य पूर्ण होते आणि येशू पवित्रस्थान सोडतो, तेव्हा वारे सोडले जातात, आणि सैतानाला संपूर्ण अधिकार दिला जातो की त्याने जगाला एका महान संकटकाळात ढकलावे, जो यरुशलेमच्या विनाशाच्या पद्धतीनुसार असेल:

"जेव्हा तो पवित्रस्थान सोडतो, तेव्हा अंधार पृथ्वीवरील रहिवाशांना वेढून टाकतो. त्या भयंकर काळात धार्मिक लोकांना एक पवित्र देवाच्या उपस्थितीत मध्यस्थाविना जगावे लागेल. दुष्टांवर असलेले बंधन काढून टाकले जाईल, आणि सैतानाला शेवटी हट्टी व पश्चात्ताप न करणाऱ्यांवर संपूर्ण अधिकार मिळेल. देवाचे सहनशीलपण संपेल. जगाने त्याची दया नाकारली असेल, त्याचे प्रेम तुच्छ मानले असेल, आणि त्याच्या नियमावर पाय ठेवला असेल. दुष्ट त्यांच्या परीक्षाकाळाच्या सीमारेषेच्या पलीकडे गेले असतील; देवाचा आत्मा, ज्याला सतत नाकारले गेले, अखेरीस मागे घेतला जाईल. दैवी कृपेच्या आच्छादनाशिवाय ते दुष्टापासून संरक्षित राहणार नाहीत. मग सैतान पृथ्वीवरील रहिवाशांना एका महान, अंतिम संकटकाळात ढकलेल. जेव्हा देवाचे देवदूत मानवी वासनांच्या प्रचंड वाऱ्यांना रोखून ठेवणे थांबवतील, तेव्हा संघर्षाची सर्व तत्त्वे मुक्त होतील. संपूर्ण जग एका अशा विनाशात ओढले जाईल, जो प्राचीन काळी यरुशलेमवर आलेल्या विनाशापेक्षाही अधिक भयंकर असेल." (The Great Controversy, p. 614.1)

## निसर्गाची तत्त्वे भूकंप, वादळ, आणि राजकीय संघर्ष

याकडे लक्ष द्या, एलेन व्हाईट याबद्दल अजून काय सांगते:

देवाच्या दिवसाचे वर्णन योहानला प्रकटीकरणाद्वारे दिले गेले आहे. भीतीने ग्रासलेल्या असंख्य लोकांचा आक्रोश योहानाच्या कानावर पडला आहे: "त्याच्या प्रकोपाचा महान दिवस आला आहे; आणि त्याच्यासमोर कोण उभा राहू शकेल?" प्रेषित स्वतः थरथरला आणि भारावून गेला.

जर असे प्रसंग यायचे असतील म्हणजे एका अपराधी जगावर इतके प्रचंड न्याय येणार असतील तर देवाच्या लोकांसाठी आश्रय कुठे असेल? संताप ओसरेपर्यंत ते कसे सुरक्षित राहतील? योहान निसर्गातील तत्वांना ,म्हणजे भूकंप, वादळ, आणि राजकीय संघर्ष ह्यांना चार देवदूतांनी धरून ठेवलेले पाहतो. हे वारे देव आज्ञा देईपर्यंत नियंत्रणाखाली आहेत. हेच देवाच्या मंडळी चे सुरक्षित ठिकाण आहे. देवाचे देवदूत त्याचे आज्ञापालन करतात, पृथ्वीचे वारे धरून ठेवतात, जेणेकरून वारे पृथ्वीवर, समुद्रावर किंवा झाडावर वाहू नयेत, देवाचे सेवक त्यांच्या कपाळावर शिक्कामोर्तब होईपर्यंत. एक पराक्रमी देवदूत पूर्वेकडून (किंवा सुर्योदयाकडून) वर येताना दिसतो. या सर्वांत सामर्थ्यशाली देवदूताच्या हातात जिवंत देवाचा शिक्का आहे, जो जीवन देऊ शकतो, जो कपाळावर खूण किंवा लेखन अंकित करू शकतो, ज्यांना अमरत्व व अनंतकाळचे जीवन दिले जाईल. या सर्वोच्च देवदूताच्या आवाजालाच चार देवदूतांना आज्ञा देण्याचा अधिकार होता की त्यांनी चार वारे धरून ठेवावेत, जोपर्यंत हे काम पूर्ण होत नाही, आणि तो त्यांना सोडण्याची आज्ञा देत नाही. (Testimonies to Ministers, p. 444.3)

म्हणून जे देवदूत वारे धरून ठेवतात ते नैसर्गिक आपत्ती आणि राजकीय संघर्ष यांना रोखून ठेवतात. एलेन व्हाईट कशा प्रकारे नैसर्गिक आपत्ती आणि राजकीय संघर्ष यांचा उल्लेख "निसर्गाची तत्त्वे" असा करते, याकडे लक्ष द्या. नैसर्गिक जग आणि मानवी नैतिक जग या दोन्हींची यादी एकत्र केली आहे.

योहानने पाहिले की चार देवदूत पृथ्वीच्या कोपऱ्यांवर उभे आहेत, त्यांनी पृथ्वीचे चार वारे धरून ठेवले आहेत, म्हणजे वारे पृथ्वीवर, समुद्रावर किंवा झाडावर वाहू नयेत. ही चिन्हे पृथ्वीवर येणाऱ्या संकटांची प्रतिके आहेत, पण देवाचे देवदूत त्यांना दयेने धरून ठेवत आहेत, जोपर्यंत देवाचे सेवक त्यांच्या कपाळावर शिक्कामोर्तब होत नाहीत.

वारे, भूकंप आणि वादळे ही कोणत्याही बेफाम, बंधनमुक्त यांत्रिक शक्तींची मनमानी उधळण नाहीत. संपूर्ण निसर्ग पूर्ण अर्थाने शारीरिक नियमांच्या नियंत्रणाखाली आहे. ते एका उच्च इच्छेचे प्रकटीकरण आहे. "तो वारे आपल्या मुठीत धरतो;" "तो पाण्यांना आपल्या हातांच्या पोकळीत गोळा करतो;"

"तो ढगांना आपली रथं बनवतो;" "परमेश्वर पूरावर राज्य करतो; होय, परमेश्वर सदैव राजा आहे." मानवी शहाणपणाने विश्वाच्या महान सार्वभौमाला विरोध करू नये. "ज्याने जग आणि त्यातील सर्व गोष्टी निर्माण केल्या," तोच पालनकर्ता आहे. संपूर्ण निसर्ग म्हणजे केवळ त्याने निर्माण केलेल्या नियमांची अंमलबजावणी आहे, त्याच्या सार्वभौम इच्छेचे प्रकटीकरण आहे. Manuscript 10, 1906 (Manuscript Releases, Vol. 3, p. 342.2)

देवाने निसर्गात ठेवलेल्या नियमांमध्ये हे एक अद्भुत आणि भव्य सत्य आहे की परिणाम कारणाच्या मागे कधीही न चुकता येतो. जी बीजे पेरली जातात ती त्याच प्रकारची पिके निर्माण करतात. तसेच मानवी स्वभावातही आहे. जो शरीरासाठी पेरतो तो शरीरापासून नाश पिकवील. आणि जो आत्म्यासाठी पेरतो तो आत्म्यापासून अनंतकाळचे जीवन पिकवील. जर माणसे याचा विचार करतील की ते स्वतःचेच पीक पिकवत आहेत, तर त्यांनी कोणती बीजे पेरावीत याबाबत ते सावध होतील. (Manuscript 104, 1898; Manuscript Releases, Vol. 3, p. 342.3)

नैसर्गिक जग हे देवाच्या उच्च इच्छेचे एक प्रकटीकरण आहे. निर्मितीचे दृश्य जग जेव्हा शांततेने आणि पूर्ण व्यवस्थेत कार्य करते, तेव्हा ते आपल्या पित्याच्या प्रेम आणि काळजीचे प्रकटीकरण असते. पण जेव्हा वारे सोडले जातात, तेव्हा नैसर्गिक जग आणि मानवी स्वभाव त्या देवाच्या हाती दिले जातील, ज्याची निवड जगाने केली आहे. देवाच्या शिक्कामोर्तबविना निसर्गाचे आणि मानवाचे मुख सैतानाचे मन प्रतिबिंबित करील. जसा माणूस निसर्गाचा गैरवापर करतो आणि पृथ्वीचा स्वतःच्या स्वार्थी भोगांसाठी उपयोग करतो, तशी पृथ्वी त्याच्या स्वतःच्या विध्वंसक मनाचे प्रतिबिंब बनते आणि मृत्यूचे साधन बनते.

माणसांच्या कथित शहाणपणाखाली, निसर्ग अशा स्थितीत आणला जातो की तो विध्वंसक साधन ठरतो. माणसाला आशीर्वाद देण्यासाठी दिलेल्या चांगल्या गोष्टी शापात परिवर्तित होतात. दारू आणि मद्यपानाच्या वापरामुळे माणसे भुकेचा गुलाम बनतो. देव हस्तक्षेप करून वाईटाचे चांगल्यात रूपांतर

करण्यासाठी चमत्कार करत नाही; कारण त्याने संपूर्ण निसर्गाला आपल्या शाश्वत नियमांच्या अधीन ठेवले आहे. तो म्हणतो: "दुष्टांसाठी शांती नाही." सर्व काही त्यांच्याविरुद्ध युद्ध करोत. आणि निसर्ग प्रत्युत्तर देतो: "काहीही शिल्लक राहणार नाही" जर मनुष्य स्वतःला स्वतःच्या हातात घेतो, आणि स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागतो, आणि देव व निसर्गाच्या विरोधात काम करतो, तर त्याचे स्वार्थी भोगच त्याच्यासाठी मृत्यूची साधने बनतात. (Manuscript Releases, Vol. 3, p. 344.2)

निसर्ग कसा विध्वंसक साधन बनतो हे समजावून सांगताना एलेन व्हाईट दारूच्या उत्पादनाचा उल्लेख करते. माणूस नैसर्गिक द्राक्ष घेतो आणि त्याचे रूपांतर एक विध्वंसक शापात करतो. हाच सिद्धांत मोठ्या प्रमाणावर लागू होतो जेव्हा वारे सोडले जातात. बाबेलची दारू जी जगाला मद्यपी बनवते, ती संपूर्ण जगासाठी एक प्रचंड विनाशकारी "भूल" निर्माण करील. तरीसुद्धा हे परिणाम माणूस स्वतःच्या स्वार्थी भोगांमुळे निर्माण करतो, आणि हेच भोग त्याच्यासाठी मृत्यूचे साधन बनतात.

हे मृत्यूची साधने किंवा वारे म्हणजे यहेज्केल 9 मधील वधशस्त्रधारी पुरुषांच्या समांतर आहेत. येथे त्याच घटनाचे वर्णन केले जात आहे. जेव्हा देवाचे देवदूत हे वारे धरून ठेवण्यापासून मागे सरकतात, तेव्हा सैतान निसर्गाच्या शक्ती आणि राजकीय शक्तींचा पूर्ण वापर करून नाश करतो. पुन्हा पुढील उताऱ्याकडे लक्ष द्या:

"बंधूंनो, तुम्ही देवाच्या शिक्क्यासाठी तयार होण्यासाठी अजून किती वेळ लागेल? प्रत्येक पाऊल जे तुम्ही देवाने मनाई केलेल्या मार्गावर टाकता जे स्वतःच्या सुखाकडे आणि पापात ते तुम्हाला तुमच्या नाशाकडे अधिक जवळ घेऊन जाते. प्रभूच्या वचनाचे प्रत्येक अवज्ञाकृत कृत्य तुम्हाला अपूरणीय तोट्याला उघडे करते. प्रत्येक क्षण, जो तुम्ही विश्रांतीसाठी, स्वार्थी भोगांसाठी उपभोगता आणि त्यामुळे दैवी चेतावण्या आणि गुरूसाठी केले जाणारे उत्साही कार्य दुर्लक्षित करता तो तुम्हाला अंधःकाराच्या राजकुमाराच्या सामर्थ्याखाली आणि नियंत्रणाखाली आणतो. तुमचा दिवट्या कुठल्याही क्षणी त्याच्या जागेवरून हलवला जाऊ शकतो. चार पराक्रमी देवदूत अजूनही पृथ्वीचे चार वारे धरून आहेत. भयंकर विनाश पूर्णपणे येऊ नये म्हणून मनाई आहे. जमिनीवर आणि समुद्रावर होणाऱ्या दुर्घटना; वादळ, प्रचंड वारा, रेल्वे दुर्घटना, प्रचंड आगींमुळे होणारे सतत वाढणारे जीवितहानी; भीषण पूर, भूकंप, आणि वारे हे

सर्व राष्ट्रांना एका प्राणघातक संघर्षासाठी ढवळून काढतील. पण देवदूत हे चार वारे धरून आहेत, जेणेकरून देवाचे सेवक त्यांच्या कपाळावर शिक्कामोर्तब होईपर्यंत सैतानाचे भयंकर सामर्थ्य आपल्या पूर्ण क्रोधात प्रकट होऊ नये. तयार व्हा, तयार व्हा, मी तुम्हाला विनवतो, कायमचा उशीर होण्यापूर्वी तयार व्हा! सूडाचे मंत्री देवाला सोडून दिलेल्या लोकांवर भयंकर न्यायांचा वर्षाव करतील." (Review and Herald, 7 जून 1887)

आपण पुन्हा पाहतो की देवदूत जे वारे धरून ठेवतात ते म्हणजे सैतानाचे भयंकर सामर्थ्य आहे. यहेज्केल 9 आणि प्रकटीकरण 7 यांची दर्शने एकच आहेत. म्हणून वारे सोडले जाणे म्हणजे सूडाचे मंत्री म्हणून वधशस्त्र घेऊन पुरुष येतो. न्याय एका देवाला सोडून दिलेल्या लोकांवर पडतो, याचा अर्थ असा की देवाने अनिच्छेने आपली उपस्थिती मागे घेतली आहे आणि लोकांनी स्वतःसाठी निवडलेल्या देवतांमुळे सैतानाला संपूर्ण नियंत्रणाची परवानगी मिळाली आहे. वधशस्त्रधारी पुरुष म्हणजे सैतानाच्या सामर्थ्याला सोडण्याचे प्रतीक आहेत.

म्हणून आपण या घटनाक्रमाचा सारांश पुढीलप्रमाणे पाहूया:

१) देवाचे देवदूत धार्मिक लोकांचे शिक्कामोर्तब होईपर्यंत संघर्षाचे वारे धरून ठेवतात.

२) त्यानंतर येशू पवित्रस्थानातील आपल्या मध्यस्थीचे कार्य संपवतो.

३) देवाचा आत्मा सतत नाकारला गेल्यामुळे शेवटी मागे घेतला जातो, आणि दुष्टांवर असलेले बंधन काढले जाते.

४) वारे सोडले जाणे म्हणजेच वधशस्त्रे घेऊन येणाऱ्या पुरुषांच्या कार्यासारखे आहे, जे खूण नसलेल्यांचा संपूर्ण वध करतात.

५) देवाच्या शिक्क्याला नाकारल्यामुळे जगाला दुष्टापासून कोणतेही संरक्षण मिळत नाही.

६) सैतान जगाला एका अंतिम संकटकाळात ढकलतो, आणि भूकंप, वादळ आणि राजकीय संघर्षाद्वारे पृथ्वीचा नाश करतो. सैतान आणि त्याचे प्रतिनिधी हे सूडाचे मंत्री ठरतात.

७) संपूर्ण जग उद्ध्वस्त होते, आणि तो विनाश यरुशलेमच्या विनाशापेक्षाही

अधिक भयंकर असतो.

आता आपण महान संघर्ष ह्या पुस्तकामध्ये वर्णन केलेल्या यरुशलेमच्या विनाशातील घटनाक्रमाकडे लक्ष देऊ:

यहूद्यांनी स्वतःच्या बेड्या स्वतः तयार केल्या होत्या; त्यांनी स्वतःसाठी विनाशाचा प्याला भरून ठेवला होता. एका राष्ट्राच्या रूपात त्यांच्यावर आलेल्या पूर्ण विनाशात, आणि त्यांच्या विस्थापनात त्यांना भोगाव्या लागलेल्या सर्व संकटांत, ते फक्त त्यांनी स्वतः पेरलेले पीक कापत होते. संदेष्टा म्हणतो: "हे इस्राएला, तू स्वतःच आपला नाश केला आहेस;" "कारण तू आपल्या अधर्मामुळे कोसळला आहेस." (होशेय 13:9; 14:1) त्यांच्या दुःखांचे वर्णन अनेकदा देवाच्या थेट आज्ञेमुळे आलेल्या शिक्षेप्रमाणे केले जाते. हाच तो मार्ग आहे ज्याद्वारे महान फसवणारा स्वतःचे कार्य लपवण्याचा प्रयत्न करतो. दैवी प्रेम आणि दयेच्या हट्टी नकारामुळे, यहूदी लोकांनी देवाचे संरक्षण स्वतःवरून काढून घेतले, आणि सैतानाला त्यांच्यावर आपल्या इच्छेनुसार राज्य करण्याची परवानगी देण्यात आली. यरुशलेमच्या विनाशात घडवून आणलेल्या भयानक क्रूरता म्हणजे जे सैतानाच्या नियंत्रणाला शरण गेले त्यांच्यावर ते त्याच्या सूडबुद्धीच्या सामर्थ्याचे प्रात्यक्षिक आहे.

आपण जी शांती आणि संरक्षण उपभोगतो, त्याबद्दल ख्रिस्ताचे आपण ऋणी आहोत हे आपणास ठाऊक नाही. देवाचे आवरण घालणारे सामर्थ्यच आहे जे मानवजातीला पूर्णपणे सैतानाच्या नियंत्रणाखाली जाण्यापासून अडवते. अवज्ञाकारी आणि कृतघ्न लोकांनाही दुष्टाच्या क्रूर आणि दुष्ट सामर्थ्याला रोखून धरण्यात देवाच्या दयेबद्दल आणि संयमाबद्दल कृतज्ञ राहण्याचे मोठे कारण आहे. परंतु जेव्हा माणसे दैवी सहनशीलतेच्या मर्यादा ओलांडतात, तेव्हा ते कुंपण काढून टाकले जाते. देव पापी व्यक्तीच्या बाबतीत असा उभा राहत नाही की तो अपराधाविरुद्धची शिक्षा स्वतः अंमलात आणेल; परंतु जो त्याच्या दयेचा नकार देतो त्याला तो स्वतःच्या हाती सोडतो, जेणेकरून त्याने जे पेरले तेच तो कापेल. प्रत्येक नाकारलेला प्रकाशकिरण, प्रत्येक दुर्लक्षित किंवा तुच्छ मानलेली चेतावणी, प्रत्येक भोगलेली वासना, देवाच्या नियमाचे प्रत्येक उल्लंघन ही सर्व पेरलेली बीजे आहेत जी न चुकता आपले पीक देतात. देवाचा आत्मा, ज्याला सतत विरोध केला जातो, शेवटी पाप्यापासून काढून घेतला जातो, आणि मग आत्म्याच्या दुष्ट वासनांवर नियंत्रण ठेवण्याची कोणतीही शक्ती राहत नाही, आणि सैतानाच्या द्वेष आणि शत्रुत्वापासून कोणतेही

संरक्षण उरत नाही. यरुशलेमचा विनाश हा सर्वांसाठी एक भयंकर आणि गंभीर इशारा आहे त्यांच्यासाठी जे दैवी कृपेच्या देणग्यांशी खेळ करतात आणि दैवी दयेच्या विनवण्यांचा प्रतिकार करतात. देवाला पापाविषयी किती तिरस्कार आहे आणि दोषींवर कोणती निश्चित शिक्षा येणार आहे याबद्दल याहून अधिक स्पष्ट साक्ष कधीही दिली गेली नाही. - The Great Controversy, pp. 35, 36

उद्धारकर्त्याने यरुशलेमवर न्यायांच्या भेटीविषयी केलेल्या भविष्यवाणीस अजून एकदा पूर्णत्व मिळणार आहे, ज्याचा तो भयंकर विनाश हा केवळ एक फिकी सावली होती. निवडलेल्या शहराच्या भाग्यात आपण त्या जगाचे भविष्य पाहू शकतो [दुष्टांचा सार्वत्रिक विनाश] ज्याने देवाची दया नाकारली आणि त्याच्या नियमावर पाय ठेवला. पृथ्वीने तिच्या दीर्घ अपराधमय शतकांमध्ये मानवी दु:खाचे काळे अध्याय पाहिले आहेत. त्याचा विचार करताना हृदयाची तळमळ होते आणि मन थकून जाते. स्वर्गाच्या अधिकाराचा नकार देण्याचे परिणाम भयंकर झाले आहेत. परंतु भविष्यातील प्रकटीकरणात आणखी अंध:कारमय दृश्य दाखवले गेले आहे. भूतकाळातील नोंद गोंधळ, संघर्ष आणि क्रांतींची दीर्घ माळ, “योध्याचा लढा... गोंधळाच्या आवाजाने आणि रक्ताने माखलेल्या वस्त्रांनी” (यशया 9:5) हे सर्व त्या भयंकर दिवसाच्या तुलनेत काय आहेत? त्या दिवशी जेव्हा देवाचा आवरण घालणारा आत्मा पूर्णपणे दुष्टांपासून मागे घेतला जाईल, आणि मानवी वासनांचा आणि सैतानी क्रोधाचा उद्रेक रोखण्यासाठी तो अधिक काळ राहणार नाही! त्या वेळी जग सैतानाच्या राज्याचे परिणाम कधीही न पाहिल्याप्रमाणे पाहील. - The Great Controversy, p. 36.2

## ज्या राजाची आपण निवड करतो, त्याचीच आपण सेवा करतो

आपण यरुशलेमच्या विनाशात हाच घटनाक्रम पाहतो. देव यरुशलेमचे रक्षण करीत होता, पण सतत विरोध झाल्यामुळे त्याचा आत्मा मागे घेतला गेला, आणि मग सैतानाला नियंत्रण घेण्यास परवानगी मिळाली. या घटनेची तुलना मग जगाच्या शेवटाशी केली जाते. येशूच्या वधस्तंभाच्या विधीच्या वेळी, इस्राएलच्या नेत्यांनी असे म्हटले:

योहान १९:१५ ह्यावरून ते ओरडले, “त्याची वाट लावा, त्याची वाट लावा, त्याला वधस्तंभावर खिळा!” पिलात त्यांना म्हणाला, “मी तुमच्या राजाला वधस्तंभावर खिळावे काय?” मुख्य याजकांनी उत्तर दिले, “कैसरावाचून

आम्हांला कोणी राजा नाही.”

"आमचा राजा म्हणजे कैसर." त्यांनी कैसरला आपला एकमेव राजा म्हणून निवडले, त्यामुळे देवाने हा अधर्म त्यांच्या वर आणला म्हणजे त्यांना पूर्णपणे कैसरच्या नियंत्रणाखाली सोडून. चाळीस वर्षांनी कैसर परत आला आणि त्यांचा नाश केला. आणि अशा रीतीने शास्त्रातील शब्द खरे ठरले.

रोमकरांस ६:१६ आज्ञापालनाकरता ज्याला तुम्ही स्वतःस गुलाम असे समर्पण करता, ज्याची आज्ञा तुम्ही मानता त्याचे तुम्ही गुलाम आहात. ज्याचा परिणाम मरण आहे अशा पापाचे गुलाम किंवा ज्याचा परिणाम नीतिमत्त्व आहे अशा आज्ञापालनाचे तुम्ही गुलाम आहात, हे तुम्हांला ठाऊक नाही काय?

म्हणून यहेज्केल 9 मधील घटना आपल्याला जगाच्या शेवटच्या घटनांचे उदाहरण देतात. घटनाक्रम असा आहे:

१) लोक देवाच्या आज्ञा नाकारतात आणि मूर्तिपूजेत पडतात.

२) देव त्यांना त्यांच्या स्वतःच्या कृतींच्या परिणामांपासून वाचविण्यासाठी दयेने चेतावणीचा संदेश पाठवतो.

३) लोक अंतिम चेतावणी नाकारतात आणि खोट्या धर्माच्या व खोट्या देवतांच्या नेतृत्वाखाली स्वतःला मजबूत करतात.

४) मूर्तिपूजेशी संबंधित दुसरी आज्ञा आपल्याला सांगते की जो न्याय होतो तो म्हणजे पित्यांचे अधर्म मुले, नातवंडे आणि त्यांच्या पिढ्यांपर्यंत येतात. याचा अर्थ असा की जे पाप पित्यांनी केले आणि जी मुले ती पाप चालवत व वाढवत राहिली, ती न्यायाला सामोरे जातील.

५) सतत नकार दिल्यानंतर देवाचा आत्मा मागे घेतला जातो, आणि देवाच्या लोकांनी ज्याची निवड केली तो राष्ट्राचा देव त्याच्या धर्मत्यागी लोकांवर अधिकार मिळवतो.

६) मग सैतानाला पूर्ण अधिकार दिला जातो की देवाची खूण किंवा शिक्कामोर्तब नसलेल्यांचा नाश करावा.

आपण यहेज्केल 9 मधील या वचनांमध्ये आत्म्याला मागे घेणे आणि लोकांच्या अधर्माची भेट त्यांच्यावर पडणे ही प्रक्रिया पाहू शकतो:

देवाचा आत्मा मागे घेतला जातो.

यहेज्केल ९:३ करूबारूढ असलेल्या इस्राएलाच्या देवाचे तेज तेथून निघून मंदिराच्या उंबरठ्यावर आले; आणि कंबरेनजीक कारकुनाची दऊत असलेल्या व शुभ्र तागाचे वस्त्र ल्यालेल्या त्या मनुष्यास त्याने हाक मारली.

इस्राएलची पापे त्यांच्यावरच भेट म्हणून परत केली जातात.

यहेज्केल ९:१० मी तर कृपादृष्टी करणार नाही, गय करणार नाही, त्यांच्या आचाराचे प्रतिफळ त्यांच्या शिरी लादीन."

"प्रतिफळ" या शब्दासाठी मूळ हिब्रू शब्द "नाथान" वापरला आहे, ज्याचा अर्थ "देणे" असा होतो. याचा अर्थ असा आहे की देव त्यांना तेच देतो जे ते इच्छित होते. जेव्हा देव त्यांना त्यांची इच्छा देतो, तेव्हा तो त्यांच्या मार्गाची म्हणजे अधर्माची भेट त्यांच्यावर परत करतो. इस्राएलने सैतानाने तयार केलेल्या देवाची निवड केली, म्हणून देवाने त्यांना त्यांनी निवडलेला नेता दिला आणि त्याला पूर्ण नियंत्रण घेऊ दिले.

देवाचा आत्मा, ज्याला सतत विरोध केला जातो, शेवटी पाप्यापासून मागे घेतला जातो, आणि मग आत्म्याच्या दुष्ट वासनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी काहीही सामर्थ्य राहत नाही, आणि सैतानाच्या द्वेष आणि शत्रुत्वापासून कोणतेही संरक्षण उरत नाही. यरुशलेमचा विनाश हा सर्वांसाठी एक भयंकर आणि गंभीर इशारा आहे जे दैवी कृपेच्या देणग्यांशी खेळ करतात आणि दैवी दयेच्या विनवण्यांचा प्रतिकार करतात. देवाला पापाविषयी किती तिरस्कार आहे आणि दोषींवर कोणती निश्चित शिक्षा पडणार आहे याबद्दल याहून अधिक ठाम साक्ष कधीच दिली गेली नाही. — The Great Controversy, p. 36.1

## मारण्याची आज्ञा

पण मग देवाने पुरुष, स्त्रिया आणि मुलांचा वध करण्याविषयी दिलेल्या आज्ञांचे काय?

यहेज्केल ९:५-८ मला ऐकू येईलसे तो त्या बाकीच्यांना म्हणाला, "त्याच्यामागून नगरात जा व संहार करा; कृपादृष्टी करू नका; गय करू नका, वृद्ध, तरुण व कुमारी, मुले व स्त्रिया ह्यांची निखालस कत्तल करा; पण

ज्यांच्यावर चिन्ह असेल त्यांना स्पर्श करू नका; माझ्या पवित्रस्थानापासून आरंभ करा." तेव्हा मंदिरापुढे असलेल्या वडिलांपासून त्यांनी आरंभ केला. त्याने त्यांना म्हटले, "मंदिर भ्रष्ट करा; अंगणे वधलेल्यांनी भरून टाका; चला, निघा." तेव्हा त्यांनी जाऊन नगरात संहार चालवला. त्यांनी अशी कत्तल चालवली असता मी सुटलो, तेव्हा मी उपडा पडून ओरडून म्हणालो, "हायहाय! प्रभू परमेश्वरा, तू यरुशलेमेवर आपल्या क्रोधाचा वर्षाव करून अवघ्या अवशिष्ट इस्राएलांचा विध्वंस करशील काय?"

असे वचन आपल्याला देवाच्या स्वभावाविषयी आपण काय विश्वास ठेवतो यावर प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करतात.

देव तरुण स्त्रिया आणि लहान मुलांचा वध करण्याची आज्ञा देतो का? आपण अनुसरलेली प्रक्रिया हे स्पष्टपणे समजावून सांगते की हा वध कसा घडतो, पण चला यावर थोडं अधिक विचार करूया.

लूक १९:१२-२७ तो म्हणाला, "कोणीएक उमराव, आपण राज्य मिळवून परत यावे ह्या उद्देशाने दूर देशी गेला. त्याने आपल्या दहा दासांना बोलावले व त्यांना दहा मोहरा देऊन सांगितले, 'मी येईपर्यंत त्यांवर व्यापार करा.' त्याच्या नगरचे लोक त्याचा द्वेष करत, म्हणून त्यांनी त्याच्या मागोमाग वकील पाठवून सांगितले, 'ह्याने आमच्यावर राज्य करावे अशी आमची इच्छा नाही.' मग असे झाले की, तो राज्य मिळवून परत आल्यावर ज्या दासांना त्याने पैसा दिला होता त्यांनी व्यापारात काय काय मिळवले हे पाहावे म्हणून त्याने त्यांना आपणाकडे बोलावण्यास सांगितले. मग पहिला त्याच्यासमोर येऊन म्हणाला, 'महाराज, आपल्या मोहरेवर मी दहा मोहरा मिळवल्या आहेत.' त्याने त्याला म्हटले, 'शाबास, भल्या दासा; तू लहानशा गोष्टीत विश्वासू राहिलास म्हणून दहा नगरांवर तुला अधिकार दिला आहे.' नंतर दुसरा येऊन म्हणाला, 'महाराज, आपल्या मोहरेवर मी पाच मोहरा कमवल्या आहेत.' त्यालाही त्याने म्हटले, 'तुलाही पाच नगरांवर अधिकार दिला आहे.' मग आणखी एक येऊन म्हणाला, 'महाराज, ही पाहा आपली मोहर. ही मी रुमालात बांधून ठेवली होती. कारण आपण करडे असल्यामुळे मला आपली भीती वाटली; जे आपण ठेवले नाही ते उचलून घेता व जे आपण पेरले नाही त्याची कापणी करता.' तो त्याला म्हणाला, 'अरे दुष्ट दासा, मी तुझ्याच तोंडाने तुझा न्याय करतो. मी करडा माणूस आहे, जे मी ठेवले नाही ते उचलून घेतो व जे मी पेरले नाही त्याची कापणी करतो, हे तुला ठाऊक होते काय? मग तू माझा पैसा पेढीवर का ठेवला नाहीस? ठेवला असतास

तर मी येऊन तो व्याजासह वसूल केला असता.’ मग त्याने जवळ उभे राहणाऱ्यांना सांगितले, ‘ह्याच्यापासून ती मोहर घ्या व ज्याच्याजवळ दहा मोहरा आहेत त्याला द्या.’ ते त्याला म्हणाले, ‘महाराज, त्याच्याजवळ तर दहा मोहरा आहेत!’ मी तुम्हांला सांगतो, ज्या कोणाजवळ आहे त्याला दिले जाईल, आणि ज्याच्याजवळ नाही त्याचे जे आहे तेदेखील त्याच्यापासून घेतले जाईल. आता ज्या माझ्या वैऱ्यांच्या मनात मी त्यांच्यावर राज्य करू नये असे होते त्यांना येथे आणा व माझ्यादेखत ठार मारा.”

ही गोष्ट लूक या पुस्तकात सांगितलेल्या "मोहरांच्या दृष्टांताची" आहे. 14व्या वचनात असे म्हटले आहे की नागरिक त्या सरदाराचा तिरस्कार करीत होते. हा सरदार देवाचे व्यापक अर्थाने प्रतिनिधित्व करतो, आणि विशिष्ट अर्थाने ख्रिस्ताचे. देवाचा तिरस्कार करणाऱ्यांचे काय होते?

निर्गम २०:५ त्यांच्या पाया पडू नकोस किंवा त्यांची सेवा करू नकोस; कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे; जे माझा द्वेष करतात त्यांच्या मुलांना तिसऱ्या-चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल मी शासन करतो;

ज्याने आपली मोहर एका रुमालात ठेवली होती, त्या माणसाने म्हटले की त्याला माहिती होते की सरदार कठोर आणि कठीण आहे. या माणसाने आपल्या सरदारावरील स्वतःच्या द्वेषाला सरदारावर प्रक्षेपित केले, म्हणजेच त्याला कसा न्याय दिला त्यातून त्याने स्वतःचेच मन त्याच्यावर टाकले. बायबलमधून हे स्पष्ट दिसते की सरदार असा नव्हताच. मग सरदाराने काय सांगितले? सरदाराने त्या माणसावर त्याचा स्वतःचा न्याय आणि त्याचे स्वतःचे मार्ग आणले.

लूक १९:२२ तो त्याला म्हणाला, ‘अरे दुष्ट दासा, मी तुझ्याच तोंडाने तुझा न्याय करतो. मी करडा माणूस आहे, जे मी ठेवले नाही ते उचलून घेतो व जे मी पेरले नाही त्याची कापणी करतो, हे तुला ठाऊक होते काय?

महत्त्वाचे म्हणजे लूकमधील या कथेत आणि मत्तयमधील न्यायाच्या वर्णनात असलेले साम्य पाहूया.

मत्तय २५:२४-३० नंतर ज्याला एक हजार मिळाले होते तोही येऊन म्हणाला, ‘महाराज, मी जाणून होतो की, तुम्ही कठोर माणूस आहात; जेथे तुम्ही पेरले नाही तेथे कापणी करता व जेथे पसरून ठेवले नाही तेथून गोळा करता; म्हणून मी भ्यालो व तुमचे हजार रुपये मी जाऊन जमिनीत लपवून ठेवले होते; पाहा, ते

तुमचे तुम्हांला मिळाले आहेत.’ तेव्हा त्याच्या धन्याने त्याला उत्तर दिले, ‘अरे दुष्ट व आळशी दासा, जेथे मी पेरले नाही तेथे कापतो व पसरून ठेवले नाही तेथून गोळा करतो हे तुला ठाऊक होते काय? तर माझे पैसे सावकारांकडे ठेवायचे होते, म्हणजे मी आल्यावर माझे मला व्याजासकट परत मिळाले असते. तर ते हजार रुपये त्याच्यापासून घ्या आणि ज्याच्याजवळ दहा हजार आहेत त्याला द्या. कारण ज्या कोणाजवळ आहे त्याला दिले जाईल व त्याला भरपूर होईल; आणि ज्या कोणाजवळ नाही त्याच्याजवळ जे असेल तेदेखील त्याच्यापासून काढून घेतले जाईल; आणि ह्या निरुपयोगी दासाला बाहेरील अंधारात टाका; तेथे रडणे व दात खाणे चालेल.’

## बाहेरील अंधार

मत्तय 25:30 मध्ये दिलेला न्याय हा लूक 19:27 मध्ये दिलेल्या न्यायाशी समांतर आहे.

मत्तय २५:३० आणि ह्या निरुपयोगी दासाला बाहेरील अंधारात टाका; तेथे रडणे व दात खाणे चालेल.’

लूक १९:२७ आता ज्या माझ्या वैऱ्यांच्या मनात मी त्यांच्यावर राज्य करू नये असे होते त्यांना येथे आणा व माझ्यादेखत ठार मारा.”

बाहेरील अंध:काराचे ठिकाण कुठे आहे?

२ पेत्र २:४ कारण ज्या देवदूतांनी पाप केले त्यांची देवाने गय केली नाही; तर त्यांना नरकात टाकले आणि न्यायनिवाड्याकरता अंधकारमय खाड्यात राखून ठेवले;

प्रकटीकरण १६:१० पाचव्याने आपली वाटी श्वापदाच्या आसनावर ओतली, तेव्हा त्याचे राज्य ‘अंधकारमय झाले,’ आणि लोकांनी वेदनांमुळे आपल्या जिभा चावल्या;

यहूदा १:११-१३ त्यांची केवढी दुर्दशा होणार! कारण ते काइनाच्या मार्गाने चालले, द्रव्यासाठी बलामाच्या भ्रांतिमार्गात बेफामपणे घुसले आणि कोरहासारखे बंड करून त्यांनी आपला नाश करून घेतला. ते तुमच्याबरोबर

खुशाल जेवतात तेव्हा ते तुमच्या प्रीतिभोजनात झाकलेले खडक असे आहेत; ते मेंढपाळ असूनही स्वतःच चरत राहतात; ते वाऱ्याने वाहून नेलेले निर्जल मेघ, हेमंत ऋतूतील फलहीन, दोनदा मेलेली, समूळ उपटलेली झाडे, असे आहेत; ते लज्जारूपी फेस दाखवणाऱ्या समुद्राच्या विक्राळ लाटा, भ्रमण करणारे तारे, असे आहेत; त्यांच्यासाठी निबिड काळोख सर्वकाळ राखून ठेवलेला आहे.

बाहेरील अंध:कारात फेकले जाणे म्हणजे ठाम आणि हट्टी विरोधानंतर सैतान व त्याच्या देवदूतांच्या नियंत्रणाखाली अनिच्छेने दिले जाणे होय. हाच तो प्रक्रियाविधी आहे ज्याद्वारे देवाचे शत्रू, जे त्याचा तिरस्कार करतात, त्याच्या समोर वध केले जातात. बायबल आपल्याला सांगते की दुष्टांचा वध कसा होतो:

स्तोत्रसंहिता ३४:२१ दुष्टाचे मरण दुष्टाईतच होणार; नीतिमानाचे द्वेष्टे दंड पावतात.

यहेज्केल अध्याय 9 मधील घटना म्हणजे त्या लोकांच्या विनाशाचे वर्णन आहे, ज्यांनी जाणीवपूर्वक खोट्या देवाची पूजा करण्याची निवड केली. शेवटच्या दिवसांत प्रत्येकाने श्वापदांची खूण किंवा देवाचा शिक्का यांपैकी एकाची निवड केलेली असेल.

प्रकटीकरण १३:१६-१७ लहानथोर, धनवान, दरिद्री, स्वतंत्र व दास, ह्या सर्वांनी आपल्या उजव्या हातावर किंवा आपल्या कपाळावर खूण करून घ्यावी; आणि ज्यांच्यावर ती खूण म्हणजे त्या श्वापदाचे नाव किंवा नावाने दर्शवलेली संख्या आहे, त्यांच्याशिवाय कोणाला काहीही विकत घेता येऊ नये किंवा विकत देता येऊ नये, असे ते श्वापद करते.

जे श्वापदाची खूण निवडतात ते स्वतःला श्वापदाच्या अधीन ठेवतात, आणि त्यामुळे श्वापदाची सत्ता त्यांच्यावर हवी तशी कृती करण्यास सक्षम होते. जसे यहूदी नेत्यांनी कैसरला आपला राजा म्हणून निवडले आणि चाळीस वर्षांनी त्याला येऊन त्यांचा नाश करण्याची सत्ता दिली गेली, तसेच शेवटच्या दिवसांत जे लोक देवाला (ज्याने शास्त्रात स्वतःला प्रकट केले) त्याचा विरोध करतात आणि रोमच्या देवाची विनाशकारी त्रिएक देवाची निवड करतात, त्यांना ठार करण्याची सत्ता रोमला दिली जाईल. या घटना दुसऱ्या आगमनापूर्वीच्या अंतिम संकटात जगाला ढकलतील. श्वापद व त्याच्या देवाची उपासना करणे म्हणजे दुसऱ्या आज्ञेचे उल्लंघन होय. दुसरी आज्ञा स्पष्टपणे आपल्याला सांगते की जे

या मूर्तिपूजेत गुंततात त्यांना देव कसा दंड देईल.

निर्गम २०:५ त्यांच्या पाया पडू नकोस किंवा त्यांची सेवा करू नकोस; कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे; जे माझा द्वेष करतात त्यांच्या मुलांना तिसऱ्या-चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल मी शासन करतो;

## बाळांना मारणे? खरंच?

इथे असे म्हटलेले नाही की देव स्वतःचे देवदूत पाठवेल की त्यांनी प्रत्यक्ष जाऊन त्यांचा वध करावा. असेही म्हटलेले नाही की देव स्वतः त्यांना ठार करील. आज्ञेत असे सांगितले आहे की तो त्यांची स्वतःची अधर्मे त्यांच्यावर आणील. तो त्यांना त्यांच्या स्वतःच्या मार्गांचा परिणाम त्यांच्या डोक्यावर येऊ देईल.

दुर्दैवाने, जे लोक असा विश्वास ठेवतात की देव स्वतः दुष्टांचा वध करेल, ते त्या एक मोहर असलेल्या मनुष्याशी स्वतःला जोडत आहेत कारण तेही देव कठोर आणि निर्दयी आहे असा विश्वास ठेवतात. एक ख्रिस्ती कसा म्हणू शकतो की तरुण स्त्रिया आणि लहान बाळांना वधशस्त्रांनी ठार मारणे हे प्रेमळ आहे? ते खरोखरच असा विश्वास ठेवतात का की देव स्वतः आपल्या देवदूतांना किंवा लोकांना आदेश देतो की मुलींची माने छाटाव्यात आणि लहान बाळांचे तुकडे करावेत? असा विचार पूर्णपणे घृणास्पद आहे आणि देवाला फक्त कठोरच नव्हे तर असभ्य आणि दुष्ट म्हणूनही दर्शवितो. मूर्तिपूजकांचा देव स्वतः वध करेल असा विश्वास ठेवणे म्हणजे देवाने दुसऱ्या आज्ञेत काय सांगितले आहे याबाबत त्याला खोटारडा म्हणणे होय. देव म्हणतो की तो त्यांची स्वतःची अधर्मे त्यांच्यावर आणील, पण बरेच लोक नकळत आज्ञा काय सांगत आहेत हे नाकारतात आणि ठामपणे सांगतात की देव स्वतः आपल्या देवदूतांद्वारे त्यांचा वध करेल.

## परवानगी देणाऱ्या आज्ञांचा वापर

असे सांगितले जाते की जर देवाने एखादी आज्ञा दिली असेल, तर तोच ते करत

आहे.

यहेज्केल ९:४-६ परमेश्वर त्याला म्हणाला, “नगरामधून, यरुशलेमेमधून जाऊन जी माणसे आपल्यात होत असलेल्या सर्व अमंगळ कृत्यांमुळे उसासे टाकून विलाप करीत आहेत त्यांच्या कपाळावर चिन्ह कर.” मला ऐकू येईलसे तो त्या बाकीच्यांना म्हणाला, “त्याच्यामागून नगरात जा व संहार करा; कृपादृष्टी करू नका; गय करू नका, वृद्ध, तरुण व कुमारी, मुले व स्त्रिया ह्यांची निखालस कत्तल करा; पण ज्यांच्यावर चिन्ह असेल त्यांना स्पर्श करू नका; माझ्या पवित्रस्थानापासून आरंभ करा.” तेव्हा मंदिरापुढे असलेल्या वडिलांपासून त्यांनी आरंभ केला.

पण ही वचने दहाव्या वचनाच्या संदर्भात वाचली पाहिजेत:

यहेज्केल ९:१० मी तर कृपादृष्टी करणार नाही, गय करणार नाही, त्यांच्या आचाराचे प्रतिफळ त्यांच्या शिरी लादीन.”

“या आज्ञा म्हणजे परवानगीची भाषा आहे. विश्वात देवाच्या परवानगीशिवाय कोणीही  काही करू शकत नाही. ईयोबाला  त्रास द्यायचा होता तेव्हा सैतानाने देवाची परवानगी मागितली होती,,

ईयोब १:९-१२ सैतानाने परमेश्वराला उत्तर दिले की, “ईयोब देवाचे भय काय फुकट बाळगतो? तो, त्याचे घर व त्याचे सर्वस्व ह्याभोवती तू कुंपण घातले आहेस ना? तू त्याच्या हाताला यश दिले आहेस ना? व देशात त्याचे धन वृद्धी पावत आहे ना? तू आपला हात पुढे करून त्याच्या सर्वस्वास लावून तर पाहा, म्हणजे तो तुझ्या तोंडावर तुझा अव्हेर करील.” परमेश्वर सैतानाला म्हणाला, “पाहा, त्याचे सर्वस्व तुझ्या हाती देतो; त्याला मात्र हात लावू नकोस.” मग सैतान परमेश्वरासमोरून निघून गेला.

देवाचा हात पुढे करणे म्हणजे सैतानाच्या हाती देणे होय. आपण हाच तत्त्व अहाब आणि मीखाया यांच्या संदर्भात पाहतो.

१ राजे २२:२०-२२ परमेश्वर म्हणाला, ‘अहाबाला असा कोण मोह घालील की तो रामोथ-गिलादावर चाल करून तेथे पतन पावेल?’ तेव्हा कोणी असे, कोणी तसे म्हटले. त्या वेळी एक आत्मा जवळ येऊन परमेश्वरासमोर उभा राहिला आणि म्हणाला, ‘मी त्याला मोह घालतो.’ परमेश्वराने विचारले, ‘कसा?’ तो म्हणाला,

'मी जाऊन त्याच्या सर्व संदेष्ट्यांच्या मुखात असत्य वदवणारा आत्मा होईन.' परमेश्वर म्हणाला, 'तू त्याला मोह घालशील; जा, तुझ्याकडून हे होईल; तसेच कर.'

एक आत्मा देवापुढे येतो आणि म्हणतो की तो सर्व संदेष्ट्यांच्या तोंडात खोटेपणा ठेवील. देव त्याला पुढे जाऊन तसे करण्याची आज्ञा देतो. तर देवाने या दुष्ट आत्म्याला देवाच्या वतीने खोटे बोलण्याची आज्ञा दिली काय? देवाने त्याऐवजी या दुष्ट आत्म्याला जे करायचे होते ते करण्यास परवानगी दिली नाही काय? आणि जेव्हा परवानगी दिली तेव्हा त्या दूताला त्याची आज्ञा मिळाली नाही काय?

सैतानाला दानिएलाच्या काळाच्या आधीपासून शतकानुशतके यरुशलेमचा नाश करायचा होता. शेवटी सैतानाला शहर नष्ट करण्याची परवानगी दिली गेली, आणि ते स्वर्गराजाच्या आज्ञेच्या शब्दांत सादर केले गेले. हाच तत्त्व शौलाच्या काळातहि लागू होतो.

१ शमुवेल १६:२३ जेव्हा जेव्हा देवाकडील दुरात्म्याची शौलाला बाधा होई तेव्हा तेव्हा दावीद वीणा घेऊन आपल्या हाताने वाजवीत असे; मग शौलाला चैन पडून बरे वाटत असे, व तो दुरात्मा त्याला सोडून जात असे.

देवाने एखाद्या दुष्ट आत्म्याला शौलाला त्रास देण्याची आज्ञा दिली का, की देवाने या दुष्ट आत्म्याला तसे करण्यास परवानगी दिली?

स्तोत्रसंहिता ७८:४९ त्याने त्यांच्यावर आपला कोपाग्नी, क्रोध, रोष व संकट ह्या अनिष्टकारक दूतांची स्वारी सोडली.

देवाने पिडांमध्ये मिसरकरांचा नाश करण्यासाठी दुष्ट देवदूतांना आज्ञा दिली का, की त्यांना तसे करण्यास परवानगी दिली? या वचनातील "सोडली" हा शब्द "सोडणे" हाही अर्थ दर्शवू शकतो. देवाने सैतान आणि त्याच्या देवदूतांना त्यांच्या विनाशाच्या कामासाठी सोडून दिले किंवा परवानगी दिली.

निष्कर्ष म्हणून आपण पुढील पाहतो:

१) यहेज्केलमध्ये दिलेली शिक्षा ही मूर्तिपूजेच्या पापासाठी आहे.

२) दुसरी आज्ञा आपल्याला सांगते की मूर्तिपूजेची शिक्षा म्हणजे पाप्यांची अधर्मे त्यांच्या डोक्यावर आणली जातील. हे यहेज्केल 9:10 मध्ये स्पष्टपणे

सांगितले आहे.

३) यहेज्केल 9 चे अंशतः पूर्णत्व इ.स.पू. 586 मध्ये झाले, जेव्हा बाबेलने यरुशलेम पूर्णपणे उद्ध्वस्त केले. ही घटना दाखवते की देवाचा न्याय म्हणजे त्यांच्या स्वतःच्या अधर्माची भेट त्यांच्या डोक्यावर परतवली जाणे होय.

४) भविष्यवाणीचा आत्मा स्पष्टपणे सांगतो की पाच वधशस्त्रधारी पुरुष हे दुष्टांचा सार्वत्रिक विनाश दर्शवतात. (Testimonies for the Church, Vol. 3, p. 267)

५) दुष्टांचा सार्वत्रिक विनाश हा एलेन व्हाईटच्या मते त्याच प्रकारे होणारा प्रसंग आहे, जसा इ.स. 70 मध्ये यरुशलेमचा विनाश झाला.

६) यरुशलेमच्या विनाशाचे स्पष्ट वर्णन हे सैतानाच्या नियंत्रणाखाली सोपवले जाणे या शब्दांत केले गेले आहे. (The Great Controversy, pp. 35, 36)

७) जेव्हा येशू स्वर्गातील पवित्रस्थान सोडेल, तेव्हा सर्व धार्मिक शिक्कामोर्तब झालेले असतील. चार वारे धरून ठेवणारे देवदूत त्यांना सोडतील, आणि ज्यांनी श्वापदाची खूण स्वीकारली त्यांच्यावर सैतानाला पूर्ण अधिकार दिला जाईल. तेव्हा दुष्टांचा _सार्वत्रिक विनाश प्रकट होईल. (The Great Controversy, p. 614)

या समजुतीतून आपण देवाचे प्रेम, शहाणपण आणि न्याय पाहतो. दुष्टांना शिक्षा होते, आणि खरंच, त्यांचा वध होतो. तरीही हा प्रक्रियाविधी देवाच्या आज्ञांनुसार आणि त्याच्या स्वभावाच्या प्रकटीकरणानुसार पूर्ण होतो.

निर्गम ३४:५-७ तेव्हा परमेश्वर मेघातून उतरला व तेथे त्याच्याजवळ उभा राहिला, आणि त्याने ‘परमेश्वर’ ह्या नावाची घोषणा केली. परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : “परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, हजारो जणांवर दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा, (पण अपराधी जनांची) मुळीच गय न करणारा, असा तो वडिलांच्या दुष्टाईबद्दल पुत्रपौत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो.”

# यहेज्केल नऊची वधाची शस्त्रे

परमेश्वर त्याला म्हणाला, “नगरामधून, यरुशलेमेमधून जाऊन जी माणसे आपल्यात होत असलेल्या सर्व अमंगळ कृत्यांमुळे उसासे टाकून विलाप करीत आहेत त्यांच्या कपाळावर चिन्ह कर.” मला ऐकू येईलसे तो त्या बाकीच्यांना म्हणाला, “त्याच्यामागून नगरात जा व संहार करा; कृपादृष्टी करू नका; गय करू नका, वृद्‌ध, तरुण व कुमारी, मुले व स्त्रिया ह्यांची निखालस कत्तल करा;

पण ज्यांच्यावर चिन्ह असेल त्यांना स्पर्श करू नका; माझ्या पवित्रस्थानापासून आरंभ करा.” तेव्हा मंदिरापुढे असलेल्या वडिलांपासून त्यांनी आरंभ केला. (यहेज्केल 9:4-6)

आपला स्वर्गीय पिता खरोखर मुलींचा आणि लहान बाळांचा वध करण्याची आज्ञा देतो काय? हे येशूने आपल्याला पित्याच्या स्वभावाचे जे उदाहरण दिले त्याशी कसे जुळते?

इस्राएली मूर्तिपूजेत फारच खोलवर गुंतले होते. दहा आज्ञा आपल्याला सांगतात की देव मूर्तिपूजेशी कसा व्यवहार करतो:

त्यांच्या पाया पडू नकोस किंवा त्यांची सेवा करू नकोस; कारण मी तुझा देव परमेश्वर ईर्ष्यावान देव आहे; जे माझा द्वेष करतात त्यांच्या मुलांना तिसऱ्या-चौथ्या पिढीपर्यंत वडिलांच्या अन्यायाबद्दल मी शासन करतो; (निर्गम 20:5)

पित्यांची अधर्मे मुलांवर आणणे म्हणजे काय? आणि याचा यहेज्केल अध्याय 9 व जगाच्या शेवटाशी काय संबंध आहे?